महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/प्रवेश २०२१-२२/२०२१/ १४८८ दिनांक : १९.०३.२०२१

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित,
पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमांद्वारे प्रसिध्दी करणेबाबत..

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १०/एनजीपी/प्रवेश-२०२१-२२/६६ दिनांक २०.०१.२०२१.
२) या विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र. तंशिविकापु/विवि/प्रवेश२०२१-२२/२०२१/३८३ दिनांक २२.०१.२०२१.
३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १०/एनजीपी/प्रवेश-२०२१-२२/२३९ दिनांक १०.०३.२०२१.
४) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांनी दिनांक १६.०३.२०२१ रोजी सर्व शासकीय व अशासकी अनुदानित पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्राचार्यासोबत घेतलेली ऑनलाईन आढावा बैठक.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक १ मधील पत्रान्व्ये प्राप्त निर्देशानुसार या विभागीय कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक २ मधील पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने स्कूल कनेक्ट उपक्रम राबविण्यात सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या होत्या.

सदर स्कूल कनेक्ट उपक्रम राबविताना, शाळेतील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांबाबत माहिती संकलित करुन सदर माहिती संस्थास्तरावर जतन करुन सदर माहिती सविस्तर डेटाबेसच्या स्वरुपात वेळोवेळी मंडळाच्या (MSBTE) संकेतस्थळावर अपडेट करण्याबाबतही कळविण्यात आलेले होते.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इयत्ता दहावीत प्रवेशित विद्यार्थ्यांची मंडळाची परिक्षा एप्रिल महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शाळेच्या संपर्कात राहण्याचा कालावधी अत्यंत कमी राहीला आहे. त्यामुळे सदर उपक्रमासाठी संदर्भ क्रमांक १ व २ मधील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन आपण अधिकाधीक परिश्रम घेऊन स्कूल कनेक्ट उपक्रमाद्वारे पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. याबाबत आपण मंडळाच्या संकेतस्थळावर माहिती अपलोड करावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई (कार्यासन क्र. १०) माहितीस्तव सादर.

E:\Yogesh Kelkar\School connect programme 2021-22\Circular for School Conn Programme.docx